पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ८ /२०२३ दि.१८/०१/२०२३

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात व वागळे वाहतूक उप विभागाचे हद्दीत कोरम मॉल जवळील तारांगण वसाहतीच्या प्रवेशद्वारासमोर जुना कल्व्हर्ट बांधलेला आहे. सदर कल्व्हर्टच्या हायवेलगतच्या बाजूस ४ मीटर लांब व ४ मीटर रूंद असे खोदकाम करण्यात येणार आहे. प्र.क्र. १३ ब मधील तारांगण वसाहतीच्या प्रवेशद्वारासमोरील नाला ते हायवेलगतच्या कल्व्हर्टपर्यंत Pipe Pushing पध्दतीने दोन ओळीमध्ये १६०० मीमी. व्यासाचे पाईप टाकण्यात येणार आहेत. त्याकरीता तारांगण वसाहतीच्या गेटजवळ कोरम मॉलकडून नितीन जंक्शनकडे येणाऱ्या वाहनांना व नितीन जंक्शनकडून सर्व्हीस रोडने कोरम मॉलकडे जाणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करणे गरजेचे आहे. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** कोरम मॉलकडून नितीन जंक्शनकडे येणाऱ्या वाहनांना तारांगण वसाहतीच्या गेटजवळ **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने कोरम मॉल ते कॅडबरी जंक्शनकडे जाणाऱ्या सर्व्हीस रोडने किंवा स्लीप रोडने कॅडबरी ब्रिजखालून उजवे वळण घेवून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** नितीन जंक्शनकडून सर्व्हीस रोडने कोरम मॉलकडे जाणाऱ्या वाहनांना तारांगण वसाहतीच्या गेटजवळ येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने नितीन ब्रिज स्लीप रोडने पुढे कोरम मॉल कट येथून डावे वळण घेवून इच्छीत स्थळी जातील. तसेच संभाजीनगर परिसरात राहणाऱ्या रहिवाशांना प्रवेश राहणार आहे.

सदरची वाहतूक अधिसुचना दि. १९/०१/२०२३ रोजीपासून २ महिन्यांकरीता अंमलात राहील.

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

CamScanner

**प्रत कार्यवाहीकरीता :—**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—१ ठाणे, परिमंडळ—५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.

२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावी

CamScanner